# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.07.2024** **वारःमंगळवार**

---

•संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला प्रारंभ; 2024-25 वर्षासाठीचा अर्थसंकल्प आज सादर होणार,

•यंदाचा अर्थसंकल्प देशाच्या पुढच्या पाच वर्षांची दिशा ठरवणारा असेल – पंतप्रधानांचा विश्वास,

•2023 – 24 वर्षाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल लोकसभेत सादर; यंदाच्या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज,

•व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत देण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्णय,

•कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आज मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**अर्थसंकल्प**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला कालपासून प्रारंभ झाला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतरामन आज 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. तत्पूर्वी काल अर्थमंत्री निर्मला सीतरामन यांनी 2023-24 या वर्षाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल लोकसभेत सादर केला. यंदाच्या म्हणजे 2024-25 या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज यात व्यक्त करण्यात आला आहे. जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात अनिश्चितता असतानाही देशांतर्गत उत्पादन वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे गेल्या आर्थिक वर्षामध्ये आर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

देशाच्या विकासात सेवा क्षेत्राचं महत्त्वाचं योगदान असून 2024 मध्ये अर्थव्यवस्थेच्या विकासात सुमारे 55 टक्के वाटा सेवा क्षेत्राचा होता, असं यात नमूद करण्यात आलं आहे. तसंच उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील निर्यातीमध्ये वाढ होण्याचा अंदाजही या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेनं २०२५ या वर्षासाठी चलन फुगवट्याचा दर साडेचार टक्के आणि २०२६ साठी हाच दर ४ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

पंतप्रधान

संसदेत सादर होणारा यंदाचा अर्थसंकल्प देशाच्या पुढच्या पाच वर्षांची दिशा ठरवणारा असेल; 2047 मध्ये विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठीचा पाया या अर्थसंकल्पातून घातला जाईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी त्यांनी संसद भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधला. हे अधिवेशन सकारात्मक आणि सृजनात्मक व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. लोकसभा निवडणुकीत सर्वांनी आपापल्या पक्षासाठी काम केलं; जनतेने आपला निकालही दिला; आता पुढची पाच वर्ष सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येत देशासाठी समर्पित वृत्तीनं काम करावं, असं पंतप्रधान म्हणाले.

**<u>अर्थराज्यमंत्री</u>**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन तसंच निवृत्ती वेतन लागू करण्यासाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याचा, कोणताही प्रस्ताव नसल्याचं, केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. याबाबत या वर्षी जूनमध्ये दोन निवेदनं आली आहेत; मात्र असा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नाही, असं केंद्रीय अर्थ राज्य मंत्री पंकज चौधरी यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं.

**<u>नीटलोकसभा</u>**

लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी काल नीट युजी परीक्षा आणि स्पर्धा परीक्षा यंत्रणेबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यावर उत्तर दिलं. नीटची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं प्रधान यांनी सांगितलं. नीट परीक्षेतल्या गैरव्यवहाराची चौकशी सीबीआय करत आहे; हे प्रकरण सध्या न्यायालयात आहे. देशभरात ४ हजार ७०० केंद्रांवर नीट युजी परीक्षा घेण्यात आली. त्यातल्या एका केंद्रावरच अनियमतता झाल्याची नोंद आहे, असं प्रधान म्हणाले.

**<u>नीट-न्यायालय</u>**

नीट यूजी परीक्षेतील एका प्रश्नाच्या उत्तरासाठी दोंन पर्याय बरोबर म्हणून ग्राह्य धरण्याच्या एनटीएच्या निर्णयाबाबत आपलं मत मांडण्यासाठी दिल्ली आयआयटीनं तज्ञांची समिती नेमावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काल दिले. या समितीनं आज दुपारी 12 पर्यंत आपला अहवाल सादर करावा, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आज होणार आहे.

**<u>जातवैधता मुख्यमंत्री महासंवाद</u>**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आता सहा महिन्यांची मुदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. यामुळे आता अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपर्यंत हे विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रं सादर करू शकतील. या निर्णयामुळे विशेषतः मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रं मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत. एसईबीसी अधिनियमाचा फायदा घेऊन शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत होत्या. यामुळे एसईबीसी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी करण्यात येत होती.

**<u>पाऊस</u>**

राज्यात ठिकठिकाणी सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलं आहे, तर काही ठिकाणी नदीनाल्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. राज्यातल्या १७ जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत सरासरीएवढा पाऊस पडला आहे आणि १२ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

काल सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची नोंद झाली. विदर्भात अतिवृष्टीच्या इशाऱ्यानंतर नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना काल सुट्टी जाहीर करण्यात आली होती. जळगाव जिल्ह्यात हतनुर धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणाचे चार दरवाजे अर्धा मीटर उघडण्यात आले असून नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. मुंबई शहर आणि उपनगरात कालही पावसानं हजेरी लावली. राज्यात पावसामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांच्या मदतीसाठी पालघरसह विविध जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

राज्यात एक जून ते २१ जुलै दरम्यान सरासरी ४२४ पूर्णांक ५ मिलिमीटर पाऊस पडतो. यंदा आतापर्यंत ५३१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

**<u>हवामान</u>**

दरम्यान, हवामान विभागानं आजही रत्नागिरी आणि सातारा जिल्हयासाठी अतिमुसळधार पावसाचा तर रायगड ,सिंधुदुर्ग, पुणे आणि कोल्हापूर या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

**<u>खेडकर</u>**

वादग्रस्त प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा  खेडकर यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पिस्तुलाचा धाक दाखवून शेतकऱ्यांना धमकवल्याप्रकरणी मनोरमा खेडकर अटकेत आहेत.

**<u>पटोले</u>**

राज्यात मराठा ओबीसी आरक्षणाचा वाद महायुती सरकारनेच पेटवला असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर विरोधकांनी भूमिका स्पष्ट केली असून सर्वपक्षीय बैठकीत यासंदर्भात सविस्तर चर्चा झालेली आहे. आता निर्णय घेण्याची जबाबदारीही सरकारची आहे पण सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहे, असं पटोले म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यात भाजपाच्या मेळाव्यात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याविषयी केलेलं विधान अनुचित असल्याची प्रतिक्रीया त्यांनी दिली.

दरम्यान, अमित शहा ज्या भ्रष्टाचाऱ्याबद्दल बोलत आहेत ते आता भाजपाच्या सोबत असून भ्रष्ट्राचाराचे आरोप करणाऱ्यांना भाजपानं सोबत घेतल असल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नंदुरबार मधल्या शहादा इथं केला. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते काल बोलत होते.

**<u>तुपकर</u>**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांची संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी संघटनेतून  हकालपट्टी केली आहे. तुपकर हे संघटनेत राहून वेगळे निर्णय घेतात तसंच पक्षाच्या अनेक बैठकांना ते गैरहजर होते, यासह विविध आरोप राजू शेट्टी यांनी केले आहेत. पक्षाने घेतलेला हा निर्णय दुर्दैवी असल्याचं सांगत आगामी बैठकीत आपण कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पुढील वाटचाल जाहीर करू, अशी प्रतिक्रिया रवीकांत तुपकर यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली.

**<u>शिर्डी</u>**

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरामध्ये आषाढी यात्रेच्या सांगतेसाठी महाद्वारकाल्याचा उत्सव काल पार पडला. विठ्ठल मंदिराच्या सभा मंडपामध्ये पाच प्रदक्षिणा झाल्यानंतर काल्याची दहीहंडी फोडून महाद्वार काल्याचा हा उत्सव झाला.

शिर्डी इथं सुरु असलेल्या तीन दिवसांच्या गुरुपौर्णिमा उत्सवाचीही  काल काल्याच्या कीर्तनानं सांगता झाली. त्यानंतर श्री साईबाबा समाधी मंदिरात दहिहंडी फोडण्यात आली. यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामस्थ आणि साईभक्त उपस्थित होते.

**<u>उपोषण</u>**

जिल्हा पोलीस दलातील गैरकारभाराविरोधात अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर काल उपोषण सुरु केलं. यामध्ये महाविकास आघाडीतील राजकीय पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह पोलीस प्रशासनाकडून त्रस्त झालेल्या नागरिकांनी देखील सहभाग नोंदवला.

**<u>क्रीडा</u>**

छत्तीसगडमध्ये सध्या हॉकी इंडिया कनिष्ठ गटाच्या पश्चिम विभागीय स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये गौरव पाटीलच्या चमकदार कामगिरीमुळे हॉकी महाराष्ट्रने गोवन्स हॉकीवर 13-0 असा विजय नोंदवला. तर मुलींच्या गटात सानिका माने हिच्या कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने हॉकी राजस्थान संघाचा 11-0 असा पराभव केला.

**<u>आशियाकप क्रिकेट</u>**

श्रीलंकेतील डंबुला इथं सुरू असलेल्या आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये आज संध्याकाळी अ गटात भारतीय संघाची लढत नेपाळशी होणार आहे. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी 07:00 वाजता सुरू होईल. आत्तापर्यंतच्या सामन्यांमध्ये एकदाही पराभूत न झालेला भारतीय संघ सध्या अ गटात गुणतालिकेत आघाडीवर आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.